दि. १४/०६/२०२२

# प्रेसनोट

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | सोलापूर युनिट, पुणे परिक्षेत्र. |
| गुन्हा नोंद क्रमांक | पंढरपूर शहर पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे. |
| आरोपीचे नांव व कार्यालय | चंद्रकांत अभिमन्यू टोणपे, वय ५८ वर्षे, पद- भांडार कारकुन, नेमणूक उप विभागीय अभियंता कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर जि. सोलापूर. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु ३०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती १५,०००/- रुपये लाचेची रक्कम स्वीकारली. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | तडजोडी अंती रु १५,०००/- रुपये. |
| थोडक्यात माहिती | **पडताळणी व यशस्वी सापळा कारवाई दि १४.०६.२०२२ रोजी.**<br>यातील तक्रारदार यांनी त्यांची जमीन ही वाणिज्य व्यवसाय प्रयोजनासाठी बिगर शेती (एन.ए) करणेसाठी दि. १३.०६.२०२२ रोजी उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यालय पंढपूर येथे अर्ज सादर केला असुन सदर अर्जाचा पाठपुरावा यातील तक्रारदार करीत असताना आलोसे चंद्रकांत अभिमन्यू टोणपे, वय ५८ वर्षे, पद- भांडार कारकुन, नेम- उप विभागीय अभियंता कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर यांनी सदर शेतजमीन बिगर शेती (एन.ए) करण्याकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे ३०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती १५,०००/- रुपये स्विकारण्याचे मान्य करुन सदर लाच रक्कम ठाकरे चौक, नवीन कराड नाका, पंढरपूर येथे स्वतः स्विकारलेवरुन त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. |
| मार्गदर्शन अधिकारी | श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधिक्षक, एसीबी पुणे.<br>श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, एसीबी पुणे. |
| पर्यवेक्षण अधिकारी | श्री. संजीव पाटील, पोलीस उपअधीक्षक, एसीबी सोलापूर. |
| सापळा पथक | सदरची कारवाई चंद्रकांत कोळी, पोलीस निरीक्षक, एसीबी, सोलापूर.<br>पोलीस अंमलदार/ प्रमोद पकाले, सलीम मुल्ला, उमेश पवार, शाम सुरवसे सर्व नेम. एसीबी, सोलापूर यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे सोलापूर जिल्हयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता**- पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, श्री छत्रपती शिवाजी रंगभवन चौक सोलापूर.

संकेतस्थळ - www.acbmaharashtra.gov.in

ई मेल - www.acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार अॅप – acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक- १०६४

दुरध्वनी क्रमांक- ०२१७-२३१२६६८

व्हॉटस् अॅप क्रमांक – ९९३०९९७७००

(चंद्रकांत कोळी)
पोलीस निरीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर.